सहपत्र क्र - १

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद
## बैठक क्र. ४६
## इतिवृत्त
## दिनांक ७/१०/२०१६

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेची बैठक दिनांक ७ ऑक्टोबर २०१६ रोजी सकाळी ११.०० ते ५.०० या कालावधीत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ , यश. इन इमारत सेमीनार हॉल, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पुढील सदस्य उपस्थित होते.

१) डॉ. संजीवनी महाले – अध्यक्ष, प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
२) डॉ. रेखा टोपकर – सदस्य, प्राचार्य सांगली बी.एड. महाविद्यालय
३) डॉ. भूषण कर्डीले – सदस्य, प्राचार्य के.के.वाघ बी.एड. महाविद्यालय
४) डॉ. संजीवनी मुळे – सदस्य , प्राचार्य शा.अ. महाविद्यालय औरंगाबाद
५) डॉ. वाय.एस.राव – सदस्य, माजी प्राचार्य जळगांव बी.एड. महाविद्यालय
६) डॉ. सज्जन थूल – सदस्य , प्र. संचालक मूल्यमापन विभाग
७) डॉ. माधुरी सोनावणे – सदस्य व प्राध्यापक कृषी विद्याशाखा
८) डॉ. सुरेंद्र पाटोळे – सदस्य व प्राध्यापक वाणिज्य विद्याशाखा
९) डॉ. विजया पाटील – सदस्य व प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
१०) प्रा. विजयकुमार पाईकराव – सदस्य व प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
११) डॉ. दयाराम पवार – सदस्य व प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
१२) प्रा. सोनुणे सुभाष – सदस्य व प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
१३) प्रा. शर्मिष्ठा ओक – निमंत्रित सदस्य शिक्षणशास्त्र विद्याशाखा
१४) डॉ. कविता साळुंके – सदस्य, सचिव व प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा

सदर बैठकीस पुढील तीन सदस्यांना उपस्थित राहता येत नसल्याचे त्यांनी कळवले होते.

१) डॉ. सुरेश पाटील – सदस्य, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
२) डॉ. नलिनी पाटील – प्राचार्य एस.एन.डी.टी. , बी. एड. महाविद्यालय, पुणे.
३) डॉ. नीला डबीर – विव्दत परिषद सदस्य, मुंबई

सदर बैठकीतील उपस्थित सदस्यांचे स्वागत केल्यानंतर कोरम पूर्ण असल्याची खात्री करून मग बैठकीस सुरुवात करण्यात आली. त्यात पुढील विषयांवर निर्णय घेण्यात आले.

४६.२ विषय क्र बी.१ / एफ-१७५ / २०१६/०२

दिनांक ३० मार्च २०१६ रोजी झालेल्या ४५ व्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त आणि कार्यवृत्तास मान्यता देणेबाबत.... (सहपत्र क्र. १ व २ )

**निर्णय** – ३० मार्च २०१६ रोजी झालेल्या ४५ व्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक इतिवृत्र व कार्यवृत्रास मान्यता देण्यात आली.

४६.३.१ विषय क्र बी.१ / एफ-१७५ / २०१६/३.१

पीएच.डी. शिक्षणक्रम विषय बदलाबाबत...



सहपत्र १

पीएच.डी. दूर शिक्षण (R-६४) या शिक्षणक्रमातील कोर्सवर्क मध्ये "RES१२३- R प्रोग्रामिंग" नावाचा विषय होता. विद्यार्थ्यांच्या तांत्रिक अडचणींचा विचार करून सदर विषया ऐवजी 'RES११६ - शिक्षक आणि शिक्षक प्रशिक्षण ' हा विषय मा.कुलगुरूंची मान्यता घेऊन बदलून देण्यात आला. सदर विषय माहितीस्तव सादर.

**निर्णय** - पीएच.डी. दूर शिक्षणासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखेत प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना 'RES-१२३-R प्रोग्रामिंग' या विषयाऐवजी 'RES-११६ शिक्षक आणि शिक्षक प्रशिक्षण' हा विषय कोर्सवर्कसाठी घेण्यास मान्यता देण्यात आली व सदर विषयास विव्द्त परिषदेची मान्यता मिळावी म्हणून शिफारस करण्यात आली.

४६.३.२ विषय क्र बी.१ / एफ-१७५ / २०१६/३.२

विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमांच्या मूल्यमापक, प्राश्निक आणि मॉडरेटर नावांच्या मान्यतेबाबत...

परीक्षा विभागामार्फत प्राप्त झालेल्या आराखड्यात विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमांची प्राश्निक मुल्यामापक नावे अभ्यासकेंद्राकडून मागवून परीक्षा विभागात देण्यात आली आहे. त्यामुळे मार्च २०१६ च्या विद्याशाखा बैठकीत ठरल्याप्रमाणे परीक्षक व प्राश्निक नावे परीक्षा विभाग ठरवेल. परीक्षा विभागाने विद्याशाखानिहाय गठित केलेल्या समितीतील सदस्य संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा डॉ. विजया पाटील व डॉ. कविता साळुंकें ह्या परीक्षा विभागास संबंधीत प्राश्निक, परीक्षक, मूल्यमापक निश्चितीस मदत करतील. मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** – मूल्यमापन व परिक्षा विभागाने विद्याशाखेने पुरवलेल्या तज्ज्ञांच्या बँकेतून दरवर्षी प्राश्निक, मूल्यमापक आणि मॉडरेटर निश्चित करावे. विद्यापीठ ॲक्ट नियम क्र. १६ वी नुसार नियुक्त समिती सदस्य प्र. संचालक शिक्षण विद्याशाखा, डॉ. विजया पाटील आणि डॉ. कविता साळुंके यांनी मूल्यमापक परिक्षा विभागास प्राश्निक, मूल्यमापक नावे निश्चितीस मदत करावी यास मान्यता देण्यात आली. सदर विषयाची विव्द्त परिषद मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

४६.३.३ विषय क्र बी.१ / एफ-१७५ / २०१६/३.३

बी.एड शिक्षणक्रम प्रवेशप्रक्रिया पूर्णतः Online करणेबाबत...

बी.एड. शिक्षणक्रम प्रवेशप्रक्रिया २०१७-१९ तुकडीपासून इंजिनियरिंग,मेडिकलच्या प्रवेश प्रक्रियेनुसार पूर्णतः online करण्याचा विचार आहे. त्यासाठी नोंदणी कक्षामार्फत online प्रवेश प्रक्रिया निश्चितीसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** – बांद्रा पॉलीटेक्नीक कॉलेज चंद्रशेखर गोखले यांनी एक प्रणाली Online बी.एड. प्रवेशासाठी तयार केली आहे. त्यांचीही मदत उपरोक्त Online प्रक्रिया निश्चितीसाठी करावा असे सूचित करून सदर विषयास मान्यता देण्यात आले.

४६.३.४ बी.एड. शिक्षणक्रम दरवर्षी अंतिम गरीक्षेचे आयोजन करणेबाबत... (सहपत्र क्र. ३)

एन.सी.टी.ई. च्या नविन नियमानुसार बी.एड. २०१६- तुकडीपासून बी. एड. शिक्षणक्रमात दरवर्षी अंतिम परीक्षा आयोजन करण्यात येईल. वर्षे निहाय पेपर नावे सह्पत्र-३ मधे दिली आहेत.

प्रथम वर्षे – पाच विषयांची परीक्षा असेल.

आणि व्दितीय वर्षे – उर्वरित पाच विषयाची परीक्षा असेल.

चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** - एन.सी.टी.ई. २०१४ परिशिष्ट-१० मधे प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शक तत्वांचा विचार करत परिशिष्ट-३ मधे दिल्यानुसार बी.एड. शिक्षणक्रम अंतिम परीक्षा दरवर्षी घेण्यास (सत्र-१ प्रथम वर्षी व सत्र-२ व्दितीय वर्षी) मान्यता देण्यात आली व सदर विषयाची विव्दत परिषद मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

४६.३.५ बी.एड. शिक्षणक्रम पूर्णनोंदणीबाबत...

बी.एड. शिक्षणक्रम पूर्णनोंदणीसाठी ज्या वर्षी विद्यार्थ्यांची नोंदणी संपते त्या वर्षीचे संपूर्ण शुल्क भरून त्यांची पूर्णनोंदणी केली जाते. काही परिस्थितीत विद्यार्थ्यांची केवळ अंतिम परीक्षा बाकी असते. त्यामुळे पूर्णनोंदणी शुल्क घेतांना पुढील तक्ता विचारात घ्यावा असे वाटते

| अ.क्र. | पूर्णनोंदणीतीलअपेक्षीत शैक्षणिक कार्य | पूर्णनोंदणी शुल्क |
|---|---|---|
| १ | अंतर्गत कार्य व अंतिम परीक्षा अपूर्ण | ज्यावर्षी नोंदणी संपते त्या वर्षीचे संपूर्ण शुल्क घेण्यात यावे. |
| २ | केवळ अंतिम परीक्षा अपूर्ण | ज्यावर्षी नोंदणी संपते त्यावर्षीचे एकूण शुल्कातील केवळ विद्यापीठ हिस्सा म्हणजेच एकूण शुल्काच्या ६०% शुल्क घेण्यात यावे. |

चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** — बी.एड. शिक्षणक्रम प्रवेशित विद्यार्थ्याचे तसेच विद्याशाखेतील इतरही सर्व शिक्षणक्रमांत

पुर्नेनोंदणीकरतेवेळी ज्या विद्यार्थ्यांचे अभ्यासकेंद्रावरील कार्य पूर्ण झालेले असेल त्या विद्यार्थ्यांचे पुर्नेनोंदणी शुल्क स्वीकारतांना पुर्नेनोंदणीवर्षातील त्या शिक्षणक्रमाच्या एकूण शिक्षण शुल्कातील केवळ विद्यापीठ शुल्क घेण्यात यावे. मात्र पुर्नेनोंदणीकरते वेळी विद्यार्थ्यांचे अभ्यासकेंद्रावरील कार्य अपूर्ण असेल तर मात्र पुर्नेनोंदणी वर्षाचे संबंधीत शिक्षणक्रमाचे संपूर्ण शुल्क घेऊन मग पुर्नेनोंदणीस मान्यता देण्यात यावी. मान्यता देतांना पुर्नेनोंदणी कालावधीपूर्वी विद्यार्थ्याने त्या शिक्षणक्रमाचे केलेले सर्व शैक्षणिक कार्यास मान्यता देण्यात यावी या सूचनेसह उपरोक्त विषयास मान्यता देण्यात आली व सदर विषयाची विव्दत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

४६.३.६ विषय क्र. बी-१/१७५/२०१६/३.६

बी.एड. शिक्षणक्रम अनुपस्थित संपर्कसत्र शुल्काबाबत...

बी.एड. शिक्षणक्रमात एकूण ५४ दिवसांचे संपर्कसत्र आहेत. ती सर्व संपर्कसत्रे विद्यार्थ्यांनी पूर्ण करणे बंधनकारक आहे. काही अपरिहार्य कारणास्तव विद्यार्थी अनुपस्थित असल्यास त्याचेकडून प्रत्येक दिवसाला रु.५००/- शुल्क घेण्यात यावे. पूर्वीप्रमाणेच एकूण संपर्कसत्र दंड शुल्कातील ४०% रक्कम अभ्यासकेंद्राकडे व ६०% रक्कम विद्यापीठाकडे भरावी संबंधितांनी भरणे अपेक्षित आहे. ज्यामुळे आर्थिक संदर्भातील तांत्रिक बाबींत सुलभता राहते. चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** — बी.एड. शिक्षणक्रमास तसेच शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील इतर सर्वच शिक्षणक्रमांचे अनुपस्थित संपर्कसत्र शुल्क स्वीकारतांना संबंधीत विद्यार्थ्याने पूर्वीप्रमाणे ६०% रक्कम विद्यापीठ व



सं८प८-१

४०% रक्कम अभ्यासकेंद्रावर भरावे यास मान्यता देण्यात आली व सदर विषयाची विव्दत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

४६.३.७ विषय क्र. बी-१/१७५/२०१६/३.७

बी.एड. शिक्षणक्रम नविन संरचना व प्रात्यक्षिक कार्य मान्यतेसाठी सादर... (सहपत्र क्र. ४ )

बी.एड. शिक्षणक्रमांत २०१६-१८ तुकडीपासून पुनर्रचित अभ्यासक्रम व प्रात्यक्षिक अंमलबजावणी करण्यात येणार आहे. ती नविन अंतिम केलेली बी.एड. शिक्षणक्रम संरचना व प्रात्यक्षिक यादी मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** – बी.एड. शिक्षणक्रम पुर्नेरचनेतील शिक्षणक्रमसंरचना व प्रात्यक्षिक कार्य यासंदर्भात सहपत्र ४ मधे दिलेल्या माहितीस मान्यता देऊन विव्दत सभेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

४६.३.८ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१६/३.८

बी.एड. शिक्षणक्रम शुल्काबाबत...

बी.एड. शिकणक्रम केंद्र खर्चात केलेली वाढ व शिक्षणक्रम पुनर्रचना यामुळे शिक्षणक्रम शुल्क वाढ करणे आवश्यक होते. परंतु महाराष्ट्रातील एकूण परिस्थिती विचारात घेता यावर्षी शुल्क वाढ न करता गतवर्षी प्रमाणेच या वर्षीही रु.३५,०००/- शुल्क घेण्यात यावे. यावर्षीसाठी शुल्क विभागणी करतांना अभ्यासकेंद्राला ५० % आणि विद्यापीठाला ५० % याप्रमाणे शुल्क विभागणी करण्यात यावी तसेच संपूर्ण शुल्क विद्यापीठाकडे प्रवेशाचे वेळी जमा करून प्रवेशानंतर प्रथम संपर्क सत्रापूर्वी केंद्रांना विद्यार्थीसंख्या X रु. १७,५ ००/- याप्रमाणे एकत्रित रक्कम पाठविण्याची व्यवस्था करावी. याबाबत मा. कुलगुरूंना प्रस्ताव दिला होता.सदर प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** – २०१६-१८ तुकडीसाठी बी.एड. शिक्षणक्रम रु. ३५,०००/- घेऊन ५०% रक्कम अभ्यासकेंद्र व ५०% रक्कम विद्यापीठ याप्रमाणे शुल्क विभाजनास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. सदर विषयाची विव्दत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

४६.३.९ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१६/३.९

एम.ए.शिक्षणशास्त्र विषयाच्या पुनर्रचनेबाबत... ( सहपत्र क्र. ५)

एम.ए. शिक्षणशास्त्र ह्या शिक्षणक्रमाची यु.जी.सी. नियमांनुसार चार सत्रात विभागणी आणि सत्र निहाय वार्षीक परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यासंदर्भात तयार केलेला एम.ए. शिक्षणशास्त्र पुनर्रचनेचा आराखडा जोडला आहे. परिशिष्ट – ५ मध्ये. चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** – एम.ए. शिक्षणशास्त्र विषयाच्या पुर्नेरचनेबाबत शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील संचालक, डॉ. विजया पाटील , डॉ. कविता साळुंके आणि डॉ. सज्जन थूल या उपसमितीची बैठक घ्यावी. त्यानंतर पुन्हा समन्वयकांनी पुर्नेरचनाबाबतची टिपणी तयार करावी व पुढील शिक्षणशास्त्र विद्याशाखेत ती मान्यतेसाठी ठेवावी असा निर्णय घेण्यात अली.

४६.३.१० विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१६/३.१०

बी. एड. विशेष शिक्षण या शिक्षणक्रमासंदर्भात २०१६-२०१८ तुकडीसाठी तयार केलेले प्रवेश नियम व प्रक्रिया, प्रवेश जागा विभागणी व प्रवेश वेळापत्रक मान्यतेबाबत... (सहपत्र क्र. ६)

बी. एड. विशेष शिक्षण या शिक्षणक्रमाची प्रवेश प्रक्रिया (२०१६-२०१८ तुकडी )online पध्दतीने कार्यान्वित करण्यात आली आहे. त्या बाबत शिक्षणशास्त्र विद्याशाखेने मा.परीक्षा नियंत्रक /नोंदणी प्रमुख यांचेशी वेळोवेळी चर्चा करून तयार केलेले प्रवेशाचे नियम, प्रवेश जागा विभागणी, प्रवेश वेळापत्रक सहपत्र – ६ मधे जोडले आहे. चर्चा व कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** – बी.एड विशेष शिक्षण या शिक्षणक्रमाच्या प्रवेशासंदर्भात शासन तसेच आर.सी.आय. ने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचा विचार करावा अशी सूचना करून या शिक्षणक्रमासाठी तयार केलेले प्रवेश नियम, प्रवेश जागा विभागणी व प्रवेश वेळापत्रकास मान्यता देण्यात आली व सदर विषयाची विव्द्त परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

४६.३.११ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१६/३.११

बी.एड.विशेष शिक्षण अंतर्गत व प्रात्यक्षिक कार्याबाबत... (सहपत्र क्र. ७ )

बी.एड.विशेष शिक्षण या पुर्नेराचित शिक्षणक्रमात एकूण ५१ अभ्यासक्रम आहेत .त्याचे विकसन विद्याशाखेमार्फत सुरु आहे.आर सी.आय.च्या नियमानुसार या शिक्षणक्रमाची विभागणी सत्र निहाय करण्यात आली आहे. या शिक्षण क्रमाच्या प्रथम दोन सत्रातील प्रत्येक अभ्यासक्रमात येणारी अंतर्गत प्रात्यक्षिके आणि क्षेत्रीय कार्य या संबधी नियोजन,सूचना व अंतर्गत गुणविभागणी सह्पत्र क्र.७ मध्ये जोडण्यात आली आहे .चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** - बी.एड.विशेष शिक्षण या शिक्षणक्रमच्या प्रथम दोन सत्रासाठी अभ्यासक्रमनिहाय तयार केलेल्या सह्पत्र ७ मधील प्रात्यक्षिक कार्य योजना व अंतर्गत गुणविभागणीस मान्यता देण्यात आली व सदर विषयास विव्द्त परिषदेची मान्यता मिळणेसाठी शिफारस करण्यात आली.

४६.३.१२ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१६/३.१२

बी.एड.विशेष शिक्षण या शिक्षणक्रमासाठी तज्ज्ञांच्या नावांत मान्यता मिळणेबाबत... (सहपत्र क्र. ८)

बी.एड.विशेष शिक्षण ,या शिक्षणक्रमाची प्रथम दोन सत्रांची अंतिम परीक्षा डिसेंबर १६/जानेवारी १७ मध्ये प्रस्तावित आहे . या अंतिम परीक्षेसाठी प्राश्निक,परीक्षक,समीक्षक व मूल्यमापक इ.नियुक्तीसाठी आवश्यक तज्ज्ञांची यादी तयार करून ती सह्पत्र – ८ मधे ती जोडली आहे . चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** – ' बी.एड. विशेष शिक्षण ' या शिक्षणक्रमातील प्रथम दोन सत्रांच्या अंतिम परिक्षेसाठी प्राश्रिक, परिक्षक, मूल्यमापक या कार्यासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील प्राध्यापकांची नावे समाविष्ट करावीत या सूचनेसह परिशिष्ट क्र. ८ मधील नावांना मान्यता देण्यात आली व सदर विषयास विव्द्त परिषद मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

४६.३.१३ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१६/३.१३

मूल्यशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम (E – 32) मूल्यमापन प्रक्रियेबाबत...

मूल्यशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम E – 32 या शिक्षणक्रमाची पथदर्शी तुकडी २०१५-१६ मधे कार्यान्वित होती. या तुकडीच्या कार्यवाहीचा अभ्यास केला असता या शिक्षणक्रमाचे विद्यार्थी अंतिम परीक्षेप्रमाणे अंतर्गत कार्यातही नापास होतात असे दिसून आले. तेव्हा या शिक्षणक्रमाच्या नापास विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेप्रमाणेच अंतर्गत कार्यवाही पुन्हा पूर्ण करण्यास (त्यांच्या शिक्षणक्रम व नोंदणी व पुनर्रनोंदणी कालावधीत) मान्यता द्यावी. असे वाटते. चर्चा व मान्यतेसाठी सादर.



सहपत्र – १

**निर्णय** — मूल्यशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम (E-32) या शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना अंतिम परिक्षेप्रमाणे अंतर्गत कार्यात नापास/अपूर्ण असल्यास ते नव्याने सादर करण्यास मान्यता देण्यात आली व सदर विषयास विव्द्त परिषदेची मान्यता मिळणेबाबत शिफारस करण्यात आली.

४६.३.१४ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१६/३.१४

शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमातील दोन लेखकांच्या नावांना मान्यता मिळणेबाबत...

शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचे 'विद्यार्थी सेवा व कल्याण' पुस्तकाचे लेखन सुरु करण्यात आलेले आहे. त्यासाठी पुढील दोन तज्ज्ञांनी देखील लिखाण केले आहे. त्यांच्या नावास कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी सादर.

१.प्रा. डॉ.संजय शिंदे - प्राचार्य, जिजाऊ शिक्षणशास्त्र महाविद्यालय नंदुरबार

२.प्रा.प्रदीप हिवरकर - अध्यापाकाचार्य विठ्ठलराव देशमुख अध्यापक विद्यालय माहुली, ता. खानापूर जि.सांगली

**निर्णय** — सदर विषयास ४५ व्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेत मान्यता दिल्याचे स्पष्ट करण्यात आले.

४६.३.१५ विषय क्र. बी-१/एफ १७५/२०१६/३.१५

स्वयंसहायता प्रेरक प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या (SHG)(C-32) या शिक्षणक्रमाच्या पुनर्रचित पाठ्यक्रमाच्या मान्यतेबाबत... (सह्पत्र क्र.९)

स्वयंसहायता प्रेरक प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम पाठ्यक्रम संरचना २००५ या काळात केली होती. त्यानंतर १० वर्षाच्या काळात त्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावर अनेक बदल झालेले दिसतात. त्या अनुषंगाने या शिक्षणक्रमाच्या पाठ्यक्रम पुर्नरचनेची गरज लक्षात घेऊन या शिक्षणक्रमाच्या पुर्नरचित पाठ्यक्रम सह्पत्र -९ मध्ये चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** - स्वयंसहायता प्रेरक प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या (SHG)(C-32) या शिक्षणक्रमाच्या पुर्नेरचनेत 'वस्तूची बांधणी व विक्री', 'संप्रेषण कौशल्य', 'शिक्षणातील उद्योगशीलता' तसेच मदुराई कामराज विद्यापीठ, 'सिमबॉयसीस' इंदोर या संस्थेत सुरु असणारे काही विषय घ्यावेत असे सूचित करून सहपत्र-९ मधील पुर्नेरचनेस मान्यता देण्यात आली व सदर विषयास विव्दत्त परिषदेची मान्यता मिळणेसाठी शिफारस करण्यात आली.

४६.३.१६ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१६/३.१६

स्वयंसहायता प्रेरक प्रेरिका प्रमाणपत्र (C-32) या शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रांबाबत (सह्पत्र -१०)

स्वयंसहायता प्रेरक प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी अनेक केंद्राना मान्यता देण्यात देण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष या शिक्षणक्रमाची केवळ २३ केंद्रे कार्यरत आहेत. सोबत त्या २३ अभ्यासकेंद्रांची यादी २०१६ तुकडी संदर्भात मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** - स्वयंसहायता प्रेरक प्रेरिका प्रमाणपत्र (C-32) या शिक्षणक्रमाची संपूर्ण महाराष्ट्रात ७२ केंद्र होती. विद्यापीठाच्या नवीन धोरणाचा विचार करता, 'सलग तीन वर्षे २० विद्यार्थी प्रवेशित असतील तेथे अभ्यासकेंद्र सुरु ठेवावीत अन्यथा ती केंद्र बंद करावीत' या नुसार केवळ २३ अभ्यासकेंद्र कार्यान्वित



सहपत्र-१

ठेवता येतात. याचा विचार करून परिशिष्ट क्र. ९ मधे जोडलेल्या अभ्यासकेंद्र यादीस मान्यता देण्यात आली.

४६.३.१७ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१६/३.१८

स्वयंसहायता प्रेरक प्रेरिका प्रमाणपत्र (C-32) शिक्षणक्रमाच्या मूल्यमापनाच्या नवीन धोरणाबाबत... (सहपत्र क्र. ११)

स्वयंसहायता प्रेरक प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे मूल्यमापन २०१६-१७ तुकडीपासून नवीन सुधारित धोरणानुसार करण्यात येणार आहे. सदर योजना सहपत्र-११ मधे कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** – विद्यापीठ धोरणानुसार स्वयंसहाय्य प्रेरक प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रमातील प्रत्येक विषय ८०:२० याप्रमाणे गुण विभागणी आणि प्रत्येक विषय प्रश्नपत्रिकेत ५ गुणांचे १६ प्रश्न याप्रमाणे सहपत्र ११ मधे दिलेल्या प्रश्नपत्रिका रचनेस मान्यता देण्यात आली.

४६.३.१८ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१६/३.१८

पी.जी.डी.ड या शिक्षणक्रमाच्या मूल्यमापनाच्या नवीन धोरण....

पी.जी.डी.ड या शिक्षणक्रमाचे मूल्यमापन २०१६-१७ तुकडीपासून नवीन सुधारित धोरणानुसार करण्यात येणार आहे. सदर योजना सहपत्र-१२ मधे कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** – डॉ. ताकवले सदांशी चर्चा होणे आवश्यक असल्याने ती चर्चा करून पुढील बैठकीत पुर्नरचित टिपणी मान्यतेसाठी ठेवण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.

४६.३.१९ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१६/२०

शिक्षणशास्त्र विद्याशाखा प्रवेशित विद्यार्थी प्रवेश रद्द.केल्यास परत करावयाच्या शुल्कबाबत...

शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमांच्या संदर्भात कोणत्याही प्रवेशित विद्यार्थ्याच्या प्रवेशानंतर प्रवेश सहा महिन्यांपर्यंत कोणत्याही कारणाने प्रवेश रद्द केल्यास / झाल्यास प्रोसेसिंग शुल्क म्हणून २०% रक्कम एकूण शुल्कातून वजा करून उर्वरित ८०% रक्कम परत करावी असे वाटते. चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** – बऱ्याचवेळा प्रवेशानंतर प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबद्दल दुसरे विद्यार्थी तक्रार दाखल करतात. काहीवेळा त्यात तथ्य आढळते आणि प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या प्रवेश रद्द करण्यात येतो किंवा प्रवेशित विद्यार्थी आजार वा त्यांच्या तांत्रिक अडचणींमुळे आपला प्रवेश रद्द करू इच्छितात. तर काही वेळा प्रवेशित विद्यार्थ्यांचा दुर्देवी मृत्यू होतो. या सर्व परिस्थित प्रवेशित विद्यार्थ्यांचा दुर्देवी मृत्यू घटना वगळता. प्रवेशानंतर एक वर्षाच्या आत रद्द केल्यास/झाल्यास त्याला एकूण शुल्कातून २०% प्रोसेसिंग शुल्क वजा करून ८०% शुल्क विनाअट परत करण्यात यावे असे मान्य करण्यात आले. तसेच दुर्देवी अंत झालेल्या विद्यार्थ्यास प्रवेशीत दोन वर्षात केव्हाही घटना घडली तरी ८०% शुल्क विनाअट परत करण्यात यावे यास मान्यता देण्यात आले. आणि सदर विषयास विव्दत परिषदेची मान्यता मिळावी म्हणून शिफारस करण्यात आली.

४६.३.२० विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१६/२१

ऐनवेळेचे विषय.



सहपत्र-1

१३.३.२०.१ शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम संपर्कसत्र टिपणी व अभ्यासकेंद्र खर्च विवरणा मान्यता देणेबाबत... (सहपत्र क्र.१२)

**निर्णय** - शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचे एकूण १० दिवस संपर्कसत्राचे केलेले विभाजन सहपत्र क्र. १२ मधील टिपणीस मान्यता देण्यात आले. खर्च विवरण तक्ता वित्त समितीकडे मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

१३.३.२०.३ बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (C-३१) शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रबाबत... (परिशिष्ट – १३)

बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (C-३१) या शिक्षणक्रमासाठी अनेक अभ्यासकेंद्रांना मान्यता देण्यात आलेली आहे. परंतू प्रत्यक्ष या शिक्षणक्रमासाठी केवळ ४३ अभ्यासकेंद्र २०१६-२०१७ मध्ये कार्यरत आहेत. परिशिष्ट १२ मधे सदर अभ्यासकेंद्राची यादी तपशिलवार जोडलेली आहे. कृपया माहिती व चर्चसाठी सादर.

**निर्णय** – बालसंगोपन ४३ (सहपत्र क्र. ) केंद्रांना मान्यता देण्यात आली.

१३.३.२०.४ बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (C-३१) शिक्षणक्रमाच्या मूल्यमापन नविन धोरणाबाबत...

बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (C-३१) या शिक्षणक्रमाचे मूल्यमापन २०१६-२०१७ तुकडीपासून नविन सुधारित धोरणानूसार करण्यात येणार आहे. सदर योजना कार्योत्तर मान्यतेसाठी सादर ( परिशिष्ट.क्र.१४ )

**निर्णय** - बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम...सहपत्र क्र.१४ मधील नविन मुक्त विद्यापीठ धोरणानुसार योजने (८०:२० पॅटर्न)मान्यता देण्यात आली.

१३.३.२०.५ शालेय व्यवहारासाठी माहिती संप्रेषण आणि तंत्रविज्ञान प्रमाणपत्र (C-३५) शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्राबाबत... ( परिशिष्ट.क्र.१५ )

शालेय व्यवहारासाठी माहिती संप्रेषण आणि तंत्रविज्ञान प्रमाणपत्र (C-३५) या शिक्षणक्रमासाठी अनेक अभ्यासकेंद्रांना मान्यता देण्यात आलेली आहे. परंतू प्रत्यक्ष या शिक्षणक्रमासाठी केवळ ०६ अभ्यासकेंद्र २०१६-२०१७ मध्ये कार्यरत आहेत. सोबत अभ्यासकेंद्राची यादी तपशिलवार जोडलेली आहे. कृपया माहितीसाठी व चर्चसाठी सादर.

**निर्णय** - शालेय व्यवहारासाठी माहिती संप्रेषण आणि तंत्रविज्ञान प्रमाणपत्र शिक्षणक्रम सहपत्र क्र. -१५ मधील सहा केंद्रांना मान्यता देण्यात आली.

१३.३.२०.६ शालेय व्यवहारासाठी माहिती संप्रेषण आणि तंत्रविज्ञान प्रमाणपत्र (C-३५) शिक्षणक्रमाच्या मूल्यमापन नविन धोरणाबाबत... (सहपत्र क्र. १६)

शालेय व्यवहारासाठी माहिती संप्रेषण आणि तंत्रविज्ञान प्रमाणपत्र (C-३५) या शिक्षणक्रमाचे मूल्यमापन २०१६-२०१७ तुकडीपासून नविन सुधारित धोरणानूसार करण्यात येणार आहे. सदर योजना सहपत्र – १६ मधे कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** - शालेय व्यवहारासाठी माहिती संप्रेषण आणि तंत्रविज्ञान प्रमाणपत्र (c-३५) या शिक्षणक्रमाच्या मुक्त विद्यापीठ नविन धोरणानुसार तयार केलेल्या नविन मूल्यमापन योजनेस ८०;२० पॅटर्न व प्रत्येक प्रश्न ५ गुणांचा ठेवण्यास मान्यता देण्यात आली.



सहपत्र-1

१३.३.२०.७ शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील प्राध्यापक डॉ.डी.डी.पवार यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल त्यांच्या अभिनंदन ठराव करण्यात आला.

१३.३.२०.८ शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील एम.एड. शिक्षणक्रम विद्यार्थ्यांचे सेट/नेट परिक्षेतील यशस्वीता तसेच उच्च पदस्थ नियुक्तीबद्दल अभिनंदन ठराव करण्यात आला.

त्यानंतर उपस्थितांचे आभार मानून सभा संपली असे घोषीत करण्यात आले.

डॉ. संजीवनी महाले
प्र. संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद.

डॉ. कविता साळुंके
सचिव,शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद -३

School of Education * Y.C.M.O.U., Nashik *